# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी



• कृषि माहिती वाहिनी : (०२४५२) २२९०००, मो. ८३२९४३२०९७, ई-मेल : deevnmkv@gmail.com, deemau@rediffmail.com • फोन : (०२४५२) २२८६०१
• विद्यापीठ संकेत स्थळ : www.vnmkv.ac.in विद्यापीठाच्या बातम्यांसाठी पहा www.promkvparbhani.blogspot.com /vnmkv /vnmkv /user/vnmkv

## ४ एप्रिल — चैत्र/वैशाख शके १९४८ — २०२६

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| र रविवार | | चैत्र कृ. ३ संकष्ट चतुर्थी चंद्रोदय ०९.२६ ईस्टर संडे **५** | चैत्र कृ. १० शुभ दिवस पारशी आदर मासारंभ (दु.१.०२ प.) **१२** | वैशाख शु. २ अक्षय्यतृतीया महात्मा बसवेश्वर जयंती, श्री परशुराम जयंती मुस्लीम जिल्काद मासारंभ **१९** | वैशाख शु. १० **२६** |
| सो सोमवार | | चैत्र कृ. ४ शुभ दिवस (दु.३.२४ पर्यंत) **६** | चैत्र कृ. ११ शुभ दिवस वरूथिनी एकदशी **१३** | वैशाख शु. ३/४ विनायक चतुर्थी सौर ग्रीष्म ऋतू प्रारंभ **२०** | वैशाख शु. ११ मोहिनी एकादशी **२७** |
| मं मंगळवार | | चैत्र कृ. ५ जागतिक आरोग्य दिन **७** | चैत्र कृ. १२ भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जंयती भोजाजी महाराज पुण्यतिथी यात्रा – वर्धा **१४** | वैशाख शु. ५ शुभ दिवस **२१** | वैशाख शु. १२ शुभ दिवस **२८** |
| बु बुधवार | चैत्र शु. १४ हनुमान जन्मोत्सव उपवास पौर्णिमा प्रारंभ सकाळी ०७.०६ **१** | चैत्र कृ. ६ **८** | चैत्र कृ. १३ प्रदोष शिवरात्री श्री.अक्कलकोट स्वामी महाराज पुण्यतिथी संत गोरोबाकाका पुण्यतिथी **१५** | वैशाख शु. ६ श्रीनृसिंह नवरात्रारंभ **२२** | वैशाख शु. १३ शुभ दिवस प्रदोष **२९** |
| गु गुरूवार | चैत्र पौर्णिमा हनुमान जन्मोत्सव छ.शिवाजी महाराज पुण्यतिथी (तिथी प्रमाणे) पौर्णिमा समाप्ती सकाळी ०७.४१ **२** | चैत्र कृ. ७ **९** | चैत्र कृ.१४ अमावास्या प्रारंभ रात्री ०८.११ **१६** | वैशाख शु. ७ शुभ दिवस गुरूपुष्यामृत योग रात्री ८.५७ ते पहाटे ६.१७ पर्यंत जागतिक पुस्तक दिन **२३** | वैशाख शु. १४ शुभ दिवस श्री नृसिंह जयंती राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती पौर्णिमा प्रारंभ रात्री ०९.१२ **३०** |
| शु शुक्रवार | चैत्र कृ. १ शुभ दिवस गुड फ्रायडे छ.शिवाजी महाराज पुण्यतिथी (तारखे प्रमाणे) **३** | चैत्र कृ. ८ कालाष्टमी **१०** | चैत्र अमावास्या दर्श अमावास्या अमावास्या समाप्ती सायं. ०५.२२ **१७** | वैशाख शु. ८ शुभ दिवस (स.८.०१ नं) दुर्गाष्टमी **२४** | |
| श शनिवार | चैत्र कृ. २ शुभ दिवस **४** | चैत्र कृ. ९ महात्मा जोतिबा फुले जयंती **११** | वैशाख शु. १ शुभ दिवस वैशाखा मासारंभ **१८** | वैशाख शु. ९ सीता नवमी **२५** | |

............ १
............ २
............ ३
............ ४
............ ५
............ ६
............ ७
............ ८
............ ९
............ १०
............ ११
............ १२
............ १३
............ १४
............ १५
............ १६
............ १७
............ १८
............ १९
............ २०
............ २१
............ २२
............ २३
............ २४
............ २५
............ २६
............ २७
............ २८
............ २९
............ ३०

### या महिन्यातील करावयाची कामे

- उसावरील काणी, गवताळ वाढ असलेली बेणे काढून टाकावीत.
- सुरु ऊसास लावणीनंतर १२ ते १६ आठवड्यांनी हेक्टरी २५ किलो नत्र युरियाद्वारे द्यावे.
- ऊसावरील खोड किडीचे शिफारशी नुसार नियंत्रण करावे.
- उन्हाळी भुईमुगावरील पाने गुंडाळणाऱ्या अळीचे वेळीच नियंत्रण करावे.
- हिरव्या चाऱ्यासाठी मका, ज्वारी व बाजरीची पेरणी करावी.
- उन्हाळी पिकास आठ दिवसाचे अंतराने पाणी द्यावे. पाण्याची कमतरता असल्यास आच्छादनाचा वापर करुन एक सरीआड पाणी द्यावे.
- कुंदा, हाराळी व नागरमोथा व बहुवर्गीय तणांचा खोल नांगरट करुन अथवा खोदून नायनाट करावा.
- जमिनीची बांधबंदिस्ती करावी. पुढील हंगामातील पीक नियोजन करुन माती तपासून घ्यावी. जमिनीत शिफारशी नुसार अन्नद्रव्ये घालावीत.
- जुन महिन्यात गावरान बोरीची डोळे भरण्यासाठी छाटणी करावी.
- बोरीची छाटणी एप्रिलमध्ये करावी.
- लिंबू वर्गीय फळझाडाच्या मृग बहारासाठी बागेचे ३५ ते ५५ दिवस पाणी तोडावे.
- नवीन फळबागाचे उन्हापासून संरक्षण करावे व पाणी द्यावे.
- वैशाखी मुगाचे भुरी रोगापासुन संरक्षण करावे.
- नांगरणी केल्यानंतर रोटाव्हेटरचा वापर करू नये.
- आंबा फळाची काढणी फळाच्या पक्वते नुसार करावी व फळे सावलीत ठेवावे. शक्यतो काढणी सकाळी किंवा सायंकाळी नंतर करावी.




**उद्यानविद्या महाविद्यालय, परभणी**

स्थापना : सन १९८४ दूरध्वनी : (०२४५२) २२०५७०



टोमॅटो : परभणी यशश्री



चिंच : प्रतिष्ठाण



सिताफळ : धारूर ६

महत्त्वाच्या नोंदी

एप्रिल २०२६

# कृषि शिक्षण व रोजगाराच्या संधी

**डॉ.बी.व्ही. आसेवार**
संचालक शिक्षण तथा अधिष्ठाता (कृषि)
मो. : ७५८८०८२१३६

**डॉ.आर.पी. कदम**
विभाग प्रमुख, कृषि विस्तार शिक्षण विभाग
मो. : ९४२२८७३४३४

वनामकृवि, परभणी

इ.स. १९५६ च्या राज्यपुनर्रचनेनंतर पूर्वीच्या मध्य प्रदेशातील विदर्भाचे आठ जिल्हे तसेच पूर्वीच्या हैद्राबाद संस्थानातील मराठवाडयाचे पाच जिल्हे तत्कालीन व्दैभाषिक मुंबई राज्यात सामील झाले. १९६० साली महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर विदर्भ, मराठवाडा आणि पूर्वीच्या मुंबई राज्यातील पश्चिम महाराष्ट्राचा भाग अशा तीन प्रमुख भागांचे हे राज्य तयार झाले. जुने मुंबई राज्य, मध्यप्रदेश व हैद्राबाद संस्थान या तीन्ही ठीकाणी शिक्षणाचा आकृतीबंध, आशय परंपरा. इ. सर्वच गोष्टीं भिन्न असल्याने खरे म्हणजे या तिन्ही भागांचा स्वतंत्र विचार करुन एक वेगळे शैक्षणिक धोरण अवलंब करणे अभिप्रेत होते. परंतु १९७२ नंतर या तीनही भागात एकच नवा शैक्षणिक आकृतीबंध सुरु झालेला असल्याने एकूण महाराष्ट्राचा या तिन्ही भागातील शिक्षणाचे स्वरुप एकसारखे झाले. परिणामी, आकृतिबंध शैक्षणिक धोरणातून कृषि शिक्षणाच्या विचाराला चालना मिळाली. आयात केलेल्या अन्नधान्यावर आपली भूक भागवणारा देश असा पूर्वपरिचय असणाऱ्या आपल्या देशाची ओळख जगाला अन्नधान्यांचा पुरवठा करणारा देश अशी आज बनली आहे.

**कृषि महाविद्यालयांची स्थापना :**

भौगोलिक परिस्थितीनुसार कृषिविद्या हा एकच विषय अभ्यासक्रमात सारखा असायचा. कृषिशास्त्र, मृदशास्त्र फलोद्यान हे एका गटात तर पशुशास्त्र, पशुवैद्यक, वनस्पती विकृतीशास्त्र, कीटकशास्त्र हे दुसऱ्या गटात समाविष्ट होते. कृषि विस्तार आणि कृषि अर्थशास्त्र यांचा यामध्ये अंतर्भाव नव्हता. स्वातंत्र्यपूर्व काळातील बऱ्याचश्या कृषि महाविद्यालयांनी महाराष्ट्रातल्या कृषि शास्त्रज्ञांची फळी निर्माण करण्यात अभूतपूर्व यश मिळवले. या शास्त्रज्ञात पहिले भारतीय प्राचार्य म्हणून पुणे कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी.सी. पाटील यांचा उल्लेख गौरवाने करावा लागेल. त्यानंतर अनेक नामवंत प्राचार्य या महाविद्यालयांना लाभले. या कृषि महाविद्यालयांनी महाराष्ट्रातल्या आणि देशातल्या अनेक कृषि विद्यापीठांना समर्थ कुलगुरु पुरवले आहेत.

**कृषि विद्यापीठाची स्थापना :**

देशाच्या कृषि शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल करण्यासाठी १९४८ साली भारत सरकारने शिक्षणतज्ञ डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली एका आयोगाची नियुक्ती केली. शेती हे महत्त्वाच्या मूलभूत गरजा पुरवणारे साधन असल्यामुळे आयोगाने ह्या शेतीशी निगडीत शास्त्राचे महत्व ओळखून पारंपारीक प्रचलीत शिक्षण पध्दतीमधून कृषिशास्त्र बाजूला काढले आणि स्वतंत्ररित्या शैक्षणिक प्रणाली निर्माण करण्यासाठी कृषि विद्यापीठाची संकल्पना मांडली. त्यामुळे डॉ. राधाकृष्णन हे कृषि विद्यापीठाचे खरे जनक ठरतात. पंतनगर येथे स्थापन झालेल्या पहिल्या कृषि विद्यापीठाचा चांगला अनुभव मिळाल्यानंतर प्रत्येक राज्यात किमान एक कृषि विद्यापीठ स्थापण्यासाठी केंद्र शासनाने राज्य सरकारला भरघोस आर्थिक मदत दिली.

**महाराष्ट्रात कृषि विद्यापीठाची स्थापना :**

महाराष्ट्र राज्यात १९६९ ते १९७२ दरम्यान राहुरी (प. महाराष्ट्र) अकोला (विदर्भ) परभणी (मराठवाडा) आणि दापोली (कोकण) अशी चार कृषि हवामान आधारित विद्यापीठे कार्यरत झाली. महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम १९८३ नुसार राज्यातील चारही कृषि विद्यापीठावर प्रामुख्याने कृषि व संलग्न क्षेत्रातील शिक्षण, संशोधन आणि विस्तार शिक्षण कार्याची जबाबदारी दिलेली आहे. त्यानुसार सदरहू कृषि विद्यापीठ अंतर्गत कृषि व संलग्न विषयातील विविध पदवी अभ्यासक्रम कार्यान्वीत आहेत. साहजिकच केंद्र शासनाचे आर्थिक धोरण आणि राज्य शासनाचे कृषि धोरण यामुळे राज्यातील कृषि शिक्षण व संलग्न क्षेत्रातील परिस्थिती वेगाने बदलत असून त्यामुळे या राज्यात कृषि क्षेत्राचा भरीव विकास होत आहे.

**मराठवाडयातील कृषि शिक्षण :**

मराठवाडयाची भौगोलिक परिस्थिती आणि शेतीपध्दती विचारात घेवून येथील शेतक-यांच्या मुलांना कृषि शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देवून एकंदरीत मराठवाडयातील शेतकरी समुदायाचा विकास घडवून यावा या उदात्त हेतूने १८ मे १९७२ रोजी मराठवाडा कृषि विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. सदर विद्यापीठ स्थापन करण्यामागे खालील काही प्रामुख्याने उद्दिष्ये मांडण्यात आली होती ती अशी.

१. कृषि शिक्षण, संशोधन व विस्तार कार्य वृध्दींगत करणे.
२. विद्यार्थ्यांना कृषि व्यावसायीक शिक्षण देऊन उद्योजकता वाढीस चालना देणे.
३. तांत्रिक मनुष्यबळ निर्माण करणे.
४. स्वयंरोजगार निर्माण करणे.
५. आवश्यकतेनुसार शैक्षणिक बदल करुन गुणवत्ता वृध्दींगत करणे.
६. विद्यार्थ्यांमध्ये ग्रामीण कृषि परिस्थितीबाबत आवड निर्माण करणे व कृषि क्षेत्रातील संशोधन ग्रामीण कृषि कार्यानुभवाच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत पोहचवणे.
७. कृषि शिक्षण हे शेतकरी समुदायाशी केंद्रीत करणे व लोकाभिमुख बनविणे.

**मराठवाडा कृषि विद्यापीठातील स्थितांतरे :**

महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री कै. वसंतरावजी नाईक कृषि साठी करण्यात आलेल्या योगदानाचे मूल्य म्हणून २०१३ मध्ये मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणीचे **वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी** असे नामविस्तार करण्यात आले. कृषि विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कृषिच्या अभ्यासक्रमात बदल केला असुन कृषी शिक्षण अधिक समावेशक, लवचिक, गुणवत्तापूर्ण आणि जागतिक स्तरावर स्पर्धात्मक बनवण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

विद्यापीठात कृषि, अन्नतंत्रज्ञान, गृहविज्ञान, कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान, उद्यानविद्या, कृषि जैवतंत्रज्ञान, कृषि पणन व व्यवसाय व्यवस्थापन या विद्याशाखा कार्यरत असून आजघडीला वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत १६ घटक व ४३ विना अनुदानीत कृषि व संलग्न महाविद्यालय कार्यरत आहेत. विद्याशाखा निहाय पदवी अभ्यासक्रमास कृषि व संलग्न शासकीय महाविद्यालयाची एकुण संख्या १६ असुन त्यामध्ये एकुण १२३० एवढी प्रवेश क्षमता आहे. तसेच अशासकीय पदवी अभ्यासक्रमास कृषि सलग्न महाविद्यालयांची संख्या ४३ असुन त्यांची प्रवेश क्षमता ४१८० एवढी आहे. साधारणतः पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया जुन-जुलै महिन्यामध्ये संपन्न होत असते तसेच विज्ञान १२ वी उत्तीर्ण व NEET व CET परिक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेता येतो. कृषि परिषदेच्या संकेतस्थळावर पदवीच्या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी माहिती पुस्तिका प्रकाशित होत असते. मराठवाडयातील घटक कृषि व सलग्न महाविद्यालयाची पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

**विद्याशाखा निहाय पदवी अभ्यासक्रमास कृषि व संलग्न महाविद्यालयाची प्रवेश क्षमता**

| शैक्षणिक विद्याशाखा | शासकीय | | अशासकीय | |
|---|---|---|---|---|
| | महाविद्यालय संख्या | प्रवेश क्षमता | महाविद्यालय संख्या | प्रवेश क्षमता |
| कृषि | ०९ | ७८० | २६ | २९४० |
| उद्यानविद्या | ०१ | ६० | ०० | ०० |
| कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान | ०१ | ८० | १० | ६४० |
| अन्नतत्रज्ञान | ०१ | ८० | ०२ | १२० |
| सामुदायीक विज्ञान | ०१ | ६० | ०० | ०० |
| कृषि व्यवसाय व्यवस्थापन | ०१ | ६० | ०१ | ८० |
| कृषि जैवतंत्रज्ञान | ०१ | ५० | ०४ | ४०० |
| **एकुण** | **१५** | **११७०** | **४३** | **४१८०** |

वसंतराव नाईक मराठवाडां कृषि विद्यापीठात पदव्युत्तर (२५ विषयात) व आचार्य पदवी (२४ विषयात) शिक्षण फक्त घटक महाविद्यालयातूनच दिले जाते. पदव्युत्तर अभ्यासक्रमाची प्रवेशासाठी कृषि परिषदेमार्फत पी.जी. सीईटी परिक्षा घेण्यात येते व विविध पदव्युतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश दिला जातो. आचार्य पदवी प्रवेशासाठी पिएच.डी. सीईटी परिक्षा होते. व पदव्युतर अभ्यासक्रमासाठी निवडलेल्या विषयात आचार्य पदवी प्रवेश घेता येतो. कृषि परिषदेच्या संकेतस्थळावर पदव्युत्तर पदवी व आचार्य पदवीच्या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशासाठी माहिति पुस्तिका प्रकाशित होत असते. त्याची प्रवेश क्षमता खालील प्रमाणे आहे.

| महाविद्यालयाचे नाव | पदव्युत्तर | आचार्य |
|---|---|---|
| कृषि महाविद्यालय, परभणी | १४३ | ५९ |
| कृषि महाविद्यालय, लातूर | १०८ | -- |
| कृषि महाविद्यालय, बदनापूर | ४२ | -- |
| अन्नतंत्रज्ञान महाविद्यालय, परभणी | १५ | १० |
| कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, परभणी | १६ | ०७ |
| सामुदायीक विज्ञान महाविद्यालय, परभणी | १२ | -- |
| विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महा. लातुर | ०८ | -- |
| कृषि विपणन व व्यवसाय व्यवस्थापन महा.चाकुर | ३५ | -- |
| **एकुण** | **३१९** | **७६** |

विद्यापीठांतर्गत ०६ घटक (०५ अनुदानीत व ०१ विना अनुदानीत) व ५३ खाजगी विना अनुदानीत कृषि तंत्र विद्यालय कार्यरत असून प्रत्येक कृषि तंत्र विद्यालयाची प्रवेश क्षमता ६० असून त्याची प्रवेश क्षमता ३४२० आहे. या सर्व विद्याशाखातुन आजपावेतो ५४४७६ विद्यार्थ्यांनी पदवी, ८८०० विद्यार्थ्यांनी पदव्युत्तर व ९३३ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी संपादन केलेली आहे. विद्यापीठांतर्गत आतापर्यंत ५२१४५ विद्यार्थ्यांनी कृषितंत्र पदवीका, ४७२५ विद्यार्थ्यांनी कृषितंत्रज्ञान पदवीका व १३९१ विद्यार्थ्यांनी माळी प्रशिक्षण अभ्यासक्रम यशस्वीरित्या पूर्ण केला.

**आंतरराष्ट्रीय विद्यार्थी :**

परदेशातील ०२ पदवी, १२ पदव्युत्तर पदवी, ०२ आचार्य पदवीचे असे एकुण १६ विद्यार्थ्यांनी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठातून अभ्यासक्रम पूर्ण केलेले आहे.

**Academic Bank of Credit :**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात मागील ३ वर्षात (सन २०२२-२३, २०२३-२४ व २०२४-२५) एकुण ११८८१ विद्यार्थ्यांपैकी १०८०९ विद्यार्थ्यांनी Academic Bank of Credit मध्ये नोंदणीकृत विद्यार्थी आहेत.

**विद्यापीठातील व्याख्यान कक्ष व प्रयोग शाळा :**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठात एकुण ५१ व्याख्यानगृह उपलब्ध आहेत. १७ डिजीटल क्लासरूम आहेत आणि १३९ कार्यरत प्रयोगशाळा आहेत.

**मध्यवर्ती मार्गदर्शन व समुपदेशन यंत्रणा :**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथे विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठ स्तरावर मध्यवर्ती रोजगार मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष (Central placement and counseling cell) कार्यरत असून या विद्यापीठांतर्गत येणा-या एकुण १६ घटक महविद्यालयामध्ये सुध्दा रोजगार मार्गदर्शन व समुपदेशन कक्ष कार्यरत आहे.

**विद्यापीठाचे ज्ञानपीठ : ग्रंथालय**

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठांतर्गत परभणी येथील विद्यापीठ परिसरात केंद्रस्थानी विद्यापीठ ग्रंथालयाची सुसज्ज इमारत आहे. मुख्यालयावरील ५ महाविद्यालये व संशोधन संस्थांना ग्रंथालयातर्फे ग्रंथालय व माहितीसेवा दिली जाते. विद्यापीठाच्या शिक्षण संशोधन व विस्तार कार्यक्रमास मदत करण्यासाठी हे एकच मध्यवर्ती ग्रंथालय आहे. व्यवस्थीत ग्रंथालय सेवा देण्यासाठी मुख्यालयात ग्रंथालयाचे जाळे निर्माण करुन त्यांच्या मार्फत विद्यापीठातील सर्व महाविद्यालये संशोधन संस्था व कृषि शाळांना देखील सेवा देणे सुरु आहे. त्यासाठी आपले विद्यापीठ ग्रंथालय स्थानिक व राष्ट्रीय नेटवर्कशी जोडलेले आहे. सीएबी सिडी रोम ॲग्रीस सिडीरोम एफएसटीए सिडीरोम ॲकडमीक सर्च प्रिमीअर सिडीरोम डाटा बेसेस व ओपन जेगेट सेरा सीसी इन, इंडिया स्टेंट डॉट कॉम सेवा या विविध डाटाबेसेसच्या सहाय्याने हे ग्रंथालय माहितीसेवा देत आहे. तसेच ग्रंथालयात ८९१२५ पुस्तके, २७०७७ नियतकालीकांचे खंड, ९०१० संशोधन प्रबंध, १७०८५ ई-जर्नलस्, १८८६ ई-बुकस् (शेरा), १७१४२ बाँड व्हालूमस् ऑफ पिरॉडीकल्स, १०१३१ प्रिंट बुक थेसीस, ८९१७ थेसीस अपलोडेड ऑन कृषिकोश, २४० नियतकालीके उपलब्ध असून ग्रंथालयाची वाचक सभासदांची संख्या ३८५८ आहे.

याशिवाय इंटरनेट, इ-मेल, ओपॅक, डॉक्युमेंट डिलीव्हरी सर्व्हिस, प्रचलित माहिती प्रसारण सेवा व इतर नेटवर्क सेवा ग्रंथालयातील सभासदांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. इंटरनेट /इंट्रानेट / सीडी-रोम / सीडी ब्राउझिंग सेवा मोफत दिली जाते. दररोज सरासरी ७५ वाचक वरील सर्व माहिती सेवांचा उपभोग घेतात. ग्रंथालयाच्या सर्व सेवा उदा. देवाण घेवाण, तालिकीकरण, ग्रंथ खरेदी, नियतकालिक सेवा इ. संगणकीकृत सेवा देण्यासाठी स्लिम २१ नावाचे सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आले आहे व त्याद्वारे सेवा देणे सुरु आहे. स्लिम संगणक प्रणाली RFID प्रणाली सोबत जोडण्यात आली आहे.

**भारतीय कृषि अनुसंधान परिषदेचे मानांकन व अधिस्वीकृती**

भारतीय कृषि अनुसंधान परिषदेमार्फत विद्यापीठाचे मूल्यांकन २०१८ या कालावधीत झाले असून त्यात कृषि महाविद्यालय, गृहविज्ञान, अन्नतंत्र व कृषि अभियांत्रिकी व तंत्रज्ञान या महाविद्यालयातील पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रम व कृषि महाविद्यालय, लातूर व बदनापूर येथील पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमास अधिस्वीकृती प्रदान करण्यात आली आहे.

| विद्यापीठास प्राप्त मानांकन | | महाविद्यालयाची संख्या | मानांकन प्राप्त महाविद्यालयांची संख्या | मानांकन अप्राप्त महाविद्यालयांची संख्या |
|---|---|---|---|---|
| दर्जा | कालावधी पासून-पर्यंत | | | |
| A | २०१८-२०२३ | १६ | ११ | ०५ |

**राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्प**

भारतात कृषि हा अन्नधान्याचा मुख्य स्त्रोत आहे. हा केवळ अनेक उद्योगांना अन्न धान्यासोबतच कच्चा माल पुरवते. जीडीपी व अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी कृषि व क्षेत्र महत्वपूर्ण योगदान देते. शहरीकरणासोबत वाढणाऱ्या लोकसंख्येला पुरेसे अन्न धान्य पुरविण्यासाठी पारंपारीक शेती न करता जर शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिली तर शेतीमधून कमी वेळात जास्त उत्पादन मिळवता येईल. वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ हे गेली पन्नास वर्ष शेतकऱ्यांच्या समस्येचे निराकरण करण्यासाठी कार्यरत आहे. कृषि विद्यापीठातील व अकृषि विद्यापीठातील पदव्युत्तर व आचार्य विद्यार्थ्यांना डिजीटल तंत्रज्ञानाचा कृषि क्षेत्रात वापर करण्यासाठी व संशोधक कार्य करण्यासाठी या प्रकल्पांतर्गत सर्व सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या आहेत. करोना कार्यकाल दरम्यान एकूण ३७ऑनलाईन वेबीनार / कार्यशाळा / प्रशिक्षण घेण्यात आले असून यात ९८०० संशोधक विद्यार्थी व प्राध्यापक यांनी याचा लाभ घेतला आहे. या प्रकल्पांतर्गत विद्यापीठातील २७ शास्त्रज्ञ व ५५ पदव्युत्तर विद्यार्थ्यांनी संशोधन व प्रशिक्षणासाठी परदेशातील विविध नामांकित विद्यापीठात भेटी दिल्या.

या प्रकल्पांतर्गत विद्यार्थी, शास्त्रज्ञ व शेतकरी यांचा समावेश करुन विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. हा प्रकल्प गेली पाच वर्ष कार्यरत आहे. नाहेप प्रकल्पामध्ये सहा प्रयोगशाळा विकसीत करण्यात आल्या आहेत. यामध्ये वेंâ/कम, इन्स्टुर्मेशन, वर्कशॉप, रोबोट, ड्रोन, मेकॅट्रॉनिक्स यांच्या सहाय्याने विविध प्रयोग करुन उपकरणे यांची चाचणी व निर्मिती करण्यात येत आहे. या यंत्रासोबतच विविध उपकरणे व यंत्रे, ट्रॅक्टर, शेतकरी, शास्त्रज्ञ, विद्यार्थी यांच्या प्रयोगांसाठी व अभ्यासासाठी राष्ट्रीय कृषि उच्च शिक्षण प्रकल्पामध्ये उपलब्ध आहेत. ड्रोन आधरीत फवारणी विविध ठिकाणी घेण्यात आली आहे. शेतक-यांना शेतीतील कामे कमी वेळात व कमी कामगारांचा वापर करुन करता यावीत म्हणून ही यंत्रे व उपकरणे बनवण्यात आली आहे.

विद्यापीठाने नुकतेच सहाव्या अधिष्ठाता समितीच्या शिफारशीनुसार सुधारीत अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून स्वीकारला असून त्याला कृषि परिषद व शासन स्तरावरुन मान्यता प्राप्त करुन घेण्यात आली आहे. या सुधारीत अभ्यासक्रमानुसार भविष्यातील कृषि शिक्षणासमोरील आव्हाने पेलने शक्य होणार आहे. या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थ्यांच्या कौशल्य वाढीवर अधिक भर देण्यात येत असून भविष्यात कृषि उद्योजक निर्माण करण्यास चालना मिळेल. त्यासाठी विद्यापीठातील शैक्षणिक सुविधांचे बळकटीकरण युध्द पातळीवर करणे आवश्यक आहे. यासाठी राज्य सरकार तसेच भारतीय कृषि अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांचे कडून भरीव अनुदान उपलब्ध करुन घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत.

* * * * *